**(ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था ८,दिनांक २० ऑगस्ट,२०२१ चे सहपत्र)**

# विवरणपत्र " अ "

## जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरतीबाबत जाहीर प्रकटन

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट - क संवर्गातील रिक्त पदाच्या भरतीसाठी माहे मार्च,२०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही दरम्यान कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभुमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामिण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्राम विकास विभागाअंतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधीत **आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक** या ५ संवर्गातील माहे मार्च २०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीमधील नमुद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे सदर जाहिरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारित तपशिल खालील प्रमाणे आहे:-

### <u>दिव्यांगांकरीता आरक्षीत पदे</u>

जाहिरात क्रमांक ०१/२०१९ मध्ये नमूद आरोग्य विभागाशी संबंधीत उपरोक्त ५ संवर्गातील पदांपैकी दिव्यांगांकरीता निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणामध्ये शासन, ग्राम विकास विभागाकडील निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/प्र.क.१४१/आस्था-८, दिनांक २२/०२/२०२१ व शासन, ग्राम विकास विभागाकडील निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क.९९/ आस्था-८, दिनांक १४ जुन २०२१ अनुसार दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील प्रमाणे सुधारित **दिव्यांगांसाठी** आरक्षण नमुद करण्यात येत आहे.

| पदाचे नाव | मार्च २०१९ च्या जाहिराती नुसार भरावयाची रिक्त पदे | मार्च २०१९ च्या जाहिरातीतील दिव्यांगांकरिता आरक्षीत पदसंख्या | दिव्यांगांकरिता सुधारित आरक्षणा नुसार पदसंख्या | एकूण पदे | भरावयाच्या दिव्यांगांच्या रिक्त पदांचे समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| औषध निर्माता | १४ | निरंक | १ | १ | ASD (M) {Autism Spectum Disorder (Mild - M)} / SLD {Specific Learning} /MI {Mental Ilness } - १ |
| आरोग्य सेवक पुरुष ४० % | ५० | निरंक | १ | १ | LV {Low Vision} - १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आरोग्य सेवक महिला | १९६ | १२ | ८ | ८ | १. LV {Low Vision} - १<br>२. D,HH {Deaf / Hard of Hearing} - ३<br>३. OL{One Leg} /CP {Cerebral Palsy} /LC {Leprosy Cured}/D {Dwarfism} /AAV {Acid Attack Victims } - २<br>४. SLD {Specific Learning} /MI{Mental Ilness}-१<br>५. MD Involving LV/ D,HH/ OL/CP/LC/Dw/AAV/SLD/ MI - १ |

**वरिल प्रमाणे जाहिरात क्रमांक ०१/२०१९, दिनांक ०२/०३/२०१९ मध्ये आरोग्य सेवक (महिला) करिता १२ पदे दर्शविण्यात आली आहेत. तथापि, शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय दि.२९ मे २०१९ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दिव्यांगासाठी रिक्त पदाच्या ४ % आरक्षणानुसार ८ पदे सुधारित करुन दर्शविणेत येत आहेत.**

## खुल्या प्रवर्गातील पदे

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञाप्ती याचिका क्र. १५७३७/२०१९ अन्वये दिलेल्या आदेशा नुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे (SEBC) आरक्षण रद्द झाले असल्याने या प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेमध्ये रुपांतरीत झाल्या आहेत. त्यामुळे जाहिरात क्र. ०१/२०१९ मध्ये नमूद खुल्या प्रवर्गातील पदांच्या संख्येत व अनुषंगाने त्यामधील समांतर आरक्षणात बदल होत आहे. त्यानुसार शासन ग्रामविकास विभागाकडील पत्र क्रमांक संकीर्ण/२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८, दिनांक २० ऑगस्ट २०२१ अन्वये प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या व त्यामधील समांतर आरक्षणातील सुधारीत आरक्षीत पदसंख्या खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | मार्च २०१९ च्या जाहिरातीतील एसईबीसी प्रवर्गा करिता आरक्षीत पदे | मार्च २०१९ च्या जाहिरातीतील खुल्या प्रवर्गाकरिता आरक्षीत पदे | खुल्या प्रवर्गा करिता सुधारीत आरक्षणा नुसार पदसंख्या | खुल्या प्रवर्गासाठी भरावयाच्या रिक्त पदांचे समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माता | ३ | ० | ३ | **सर्वसाधारण - २**<br>**महिला - १** |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ४०% | ९ | ० | ५ | **सर्वसाधारण - ३**<br>**माजी सैनिक - १**<br>**अंशकालीन - १** |

## अन्य मार्गदर्शक सुचना

### १. वरिल पदांसाठीची वयोमर्यादा खालीलप्रमाणे असेल -

- अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे.
- अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- उमेदवारांची वयोमर्यादा जाहिरात क्रमांक १/२०१९,दि. ०२/०३/२०१९ मध्ये नमुद केल्यानुसार अर्ज करण्याची पध्दती मधील अ.क्र.४ नुसार वर नमुद केल्या प्रमाणे दिनांक १६/०४/२०१९ रोजीची वयोमर्यादा ही अंतिम राहील.
- सामाजिक व समांतर आरक्षणातील उमेदवारांकरीता विहित वयोमर्यादा -

| अ. क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शासन निर्णयानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | ४३ वर्षे |
| २ | अपंग उमेदवार | ४५ वर्षे |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भूकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ च्या जनगणना /सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी | |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य | |
| ७ | शासकीय कर्मचारी / जिल्हा परिषद नियमित कर्मचारी (नियुक्ती प्राधिकारी / सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहिल) | |
| ८ | अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| ९ | उच्च गुणवत्ता धारक खेळाडू उमेदवार | सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे |
| १० | माजी सैनिक | शासन, सामान्य प्रशासन विभाग शुद्धीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र. २७९/१०/१६-अ, दि.२०/०८/ २०१० अन्वये उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |
| ११ | अनाथ | खुला प्रवर्ग ३८ वर्षे |
| १२ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) | ४३ वर्षे |

२. वरील पदांसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरिता आवश्यक खालील प्रमाणे किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक असेल -

| पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| औषध निर्माता | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदविका धारण करणारे आणि औषध शास्त्र अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार |
| आरोग्य सेवक (पुरुष ) ४०% | • विज्ञान विषय घेऊन माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण झालेले उमेदवार,<br>• ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा मुलभूत पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्तीनंतर असे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहिल. |

माहे **मार्च,२०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-**

१. माहे मार्च,२०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधीत पदांकरीता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन login ID व password create करणे आवश्यक आहे.

२. माहे मार्च,२०१९ मध्ये आरोग्य **सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गांकरीता** आवेदनपत्र/ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधीत प्रवर्गातून परिक्षेकरीता पात्र राहतील.

३.मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १५७३७/२०१९ व इतर याचीकांमध्ये शासकिय नोकऱ्यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गाचे (SEBC) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणीक दृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक २३ डिसेबंर २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातून (EWS) (आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिदृष्ट्यामागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गाबाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरिल प्रमाणे नमुद संकेत स्थळावर दिनांक **०१ सप्टेंबर,२०२१ ते १४ सप्टेंबर,२०२१ या कालावधीत विकल्प** दयावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकरचा बदल करता येणार नाही. तथापि ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने आर्थिकदृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे त्याने परिक्षेपूर्वी सक्षम अधिकाऱ्यांचे आर्थिकदृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (EWS) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

४.जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास

प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत. तथापी, खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरिता पात्र आहेत अशा उमेदवारांना खुल्या प्रवार्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले परिक्षा शुल्क (यापूर्वी (SEBC) प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कम ) परिक्षेपूर्वी अदा करणे आवश्यक राहिल. सदर उमेदवारांनी दिनांक १ सप्टेंबर,२०२१ ते १४ सप्टेंबर,२०२१ या कालावधीत वरिल प्रमाणे नमुद संकेतस्थळावरुन शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहिल.

५. माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना १ किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महा परिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पद्धतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरिलप्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक १ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर,२०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल.

दिव्यांगांसाठी उपलब्ध होणा-या नवीन प्रवर्गाकरिता तसेच सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रदद झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ होणा-या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी जाहिरात देताना उमेदवारांसाठी निश्चित करावयाचे निकष **(शुल्क, वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता व इतर) सन-२०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीप्रमाणे राहील. तसेच एका उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेसाठी अर्ज करता येईल.**

६. नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगांच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर या पूर्वी माहे मार्च,२०१९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगांच्या पद निहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगांकरिता नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

७. यापूर्वी उमेदवारांकडून लेखी परिक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परिक्षा केंद्रामधून परिक्षा देणार आहे, त्या परिक्षा केंद्राबाबत प्राथम्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्यक्रमानुसार उमेदवारास संबंधीत जिल्ह्यातून परिक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.

८. माहे मार्च,२०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता एका पदाकरिता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परिक्षा शुल्क भरलेले आहे. तथापि, उमेदवारांना एकाच ठिकाणी परिक्षा देता येणार असल्याने संबंधीत उमेदवारांनी भरलेले अधिकचे परिक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी वरिलप्रमाणे नमुद संकेतस्थळावर आवश्यक बँक तपशिल नमुद करणे आवश्यक आहे.

९. विकल्प नोंदविताना काही अडचणी उद्भविल्यास उमेदवारांनी **०७२९२००६३०५** या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

वरिलप्रमाणे भरतीप्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखुन ठेवण्यात येत आहेत.

**सही /-**
**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद,अलिबाग**

**सही /-**
**सदस्य,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी** (सा.प्र.)
**रायगड जिल्हा परिषद,अलिबाग**

**सही /-**
**सदस्य,**
**जिल्हा निवड समिती, तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**सही /-**
**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा**
**जिल्हाधिकारी रायगड**